महाराष्ट्र शासन

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, २ रा माळा, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.

Email :- exciseho@vsnl.net / exciseho@yahoo.com / seasdbu@indiatimes.com

Tel.No:- Jt. Commr: 22660152, Dy.Commr:26265569, FAX No, 22662370

विषय : वाहनांच्या इंधनात मिश्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या इथेनॉलच्या विप्रकृतीकरणाबाबत.

वाचा :-१) आयुक्तालयाचे दि.१५ जून, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५१/अकरा चे परिपत्रक

२) आयुक्तालयाचे दि.२ जुलै, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे दुरुस्तीपत्रक

३) आयुक्तालयाचे दि.३ जुलै, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक

४) आयुक्तालयाचे दि.१५ जुलै, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक

५) आयुक्तालयाचे दि.३० जुलै, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक

६) आयुक्तालयाचे दि.२८ ऑगस्ट, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक

## परिपत्रक

क्रमांक डिएनएस २१९३/१५९५९/अकरा मुंबई १५ जुलै, २००४.

केंद्र शासनाच्या निर्णयानुसार सध्या राज्यात ५% इथेनॉलचे ( जलरहित मद्यार्काचे ) मिश्रण करुन ते वाहनांच्या इंधनात वापरण्यात येत आहे. सदर इथेनॉलची निर्मिती विशेष विप्रकृत मद्यार्काचे "मॉलेक्युलर सीव्ह" किंवा "एझिओट्रोपिक" पध्दतीने पुनःउर्ध्वपतन करुन केली जाते. विशेष विप्रकृत मद्यार्कामध्ये, डिनेचरंट कमिटीने मान्यता दिल्यानुसार उपरोक्त अ.क्र.१ अन्वये विहित केलेले डिनेचरंटस् व कडू पदार्थ ठराविक प्रमाणात वापरणे आवश्यक आहे. सदर परिपत्रकानुसार प्रति १०० लि. मद्यार्कात १ लिटर "बेंझिन" किंवा ०.२% "क्रोटोनलडिहाईड" हे प्राथमिक डिनेचरंट व ४ ग्रॅम "डिनोटोनियम सॅक्राईड" / "बेन्झोएट" हे कडू पदार्थ विहित केले आहेत.

"इथेनॉल" उत्पादकांच्या अडीअडचणीबाबत दि.१८.५.२००४ रोजी मा.उप-मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली इथेनॉल उत्पादकांची व "इथेनॉल" मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया" चे पदाधिकारी व प्रतिनिधी यांची सभा झाली. या बैठकीत इथेनॉल उत्पादकांनी इथेनॉलसाठी वापरावयाच्या विप्रकृत मद्यार्कातील डिनेचरंट विषयी पुढील अडचणी प्रामुख्याने नमूद केल्या.

१) विप्रकृत मद्यार्कात ०.२% क्रोटोनलडिहाईड किंवा १% बेंझिन वापरल्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होतात व आवश्यकतेपेक्षा अधिक बेंझिन वापरल्यामुळे ते वाया जाते व उत्पादक घटकांचे आर्थिक नुकसान होते. शिवाय क्रोटोनलडिहाईड बाजारात लवकर उपलब्ध होत नाही व ते महाग देखील आहे. त्यामुळे विप्रकृत मद्यार्कात १% बेंझीन ऐवजी ०.५% "बेंझिन" वापरण्यास परवानगी देण्यात यावी.

२) तसेच आर्थिक दृष्टया परवडण्यासाठी व उपलब्धतेच्या दृष्टीकोनातून "क्रोटोनलडिहाईड" ऐवजी "ब्रुसीन" या पदार्थाचा डिनेचरंट म्हणून वापर करण्यास परवानगी देण्यात यावी.

या संदर्भात दि.४.६.२००४ रोजी डिनेचरंट व तांत्रिक सल्लागार समितीची बैठक बोलविण्यात आली. त्यात समितीने मोटारींच्या इंधनात वापरावयाच्या "इथेनॉल" साठी उपयोगात आणावयाच्या डिनेचरंटसबाबत खालीलप्रमाणे शिफारसी केल्या आहेत.

२) या घटकांना विप्रकृत मद्यार्कात रंग वापरण्यापासून सूट देता येईल.

३) कडू पदार्थ म्हणून डिनेटोनियम बेंझोएट किंवा सॅकराईड सध्याच्या ४० पीपीएम ऐवजी २० पीपीएम म्हणजे प्रत्येक १०० लिटर मद्यार्कात २ ग्रॅम या प्रमाणात वापरता येईल.

मात्र "ब्रुसीन" या पदार्थाचा डिनेचरंट म्हणून वापर करावयाचा झाल्यास फार मोठया परिमाणात ( ४ पीपीएम ऐवजी २०० पीपीएम) तो करावा लागेल व एवढया मोठ्या प्रमाणात हा घनपदार्थ पेट्रोल मध्ये वापरणे तांत्रिक दृष्टया योग्य होणार नाही. त्यामुळे "ब्रुसीन" या पदार्थाचा वापर डिनेचरंट म्हणून करावयास परवानगी देता येणार नाही.

डिनेचरंट व तांत्रिक सल्लागार समितीच्या या शिफारशी विचारात घेऊन वाहनांच्या इंधनामध्ये (पेट्रोलमध्ये) मिसळण्यात येणाऱ्या इथेनॉल मध्ये विप्रकृतीकरणासाठी इतर मान्यता प्राप्त डिनेचरंट व्यतिरिक्त खालीलप्रमाणे डिनेचरंटस् व कडू पदार्थांचे प्रमाण विहित करण्यात येत आहे.

अ) प्राथमिक डिनेचरंट "बेन्झिन" किंवा "टोलीन" - ०.५% म्हणजेच ०.५ लिटर प्रति १०० ब.लि.मद्यार्कात वापर करता येईल.

ब) रंग - विप्रकृत मद्यार्कात वापरण्यास सूट देण्यात येत आहे.

क) कडू पदार्थ - "डिनेटोनियम बेन्झोएट" किंवा "डिनेटोनियम सॅकराईड" २० ppm म्हणजेच २ ग्रॅम प्रति १०० ब.लि. मद्यार्कात या प्रमाणात वापरता येईल.

ड) "ब्रुसीन" च्याबाबत इथेनॉल उत्पादकांनी ४ ग्रॅम प्रमाण वापरण्यासाठी विनंती केली असली तरी डिनेचरंट समितीने सदर प्रमाण २०० ppm असे ठरविले असून अंतर्गत ज्वलन होणाऱ्या इंजिनामधील पेट्रोलमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात घन पदार्थाचा वापर योग्य होणार नाही असे मत दिले असल्यामुळे "ब्रुसीन" या पदार्थाचा डिनेचरंट म्हणून वापर करण्यास परवानगी नाही.

उपरोक्त डिनेचरंट व कडू पदार्थांचे विहित प्रमाण फक्त वाहनांच्या इंधनात वापरण्यासाठी निर्मिती करावयाच्या इथेनॉलकरिता व त्यात वापरात येणाऱ्या विप्रकृत मद्यार्ककरिता मर्यादित राहील अन्य "इथेनॉल" व्यतिरिक्त उत्पादनाकरिता या कार्यालयाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकीय सूचना जशाच्या तशा लागू राहतील.

(स्वाक्षरी) १५/६

( विजय श्री.सावंतकर )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व इथेनॉल निर्मिती करणारे घटक
२. सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह
३. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
४. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
५. इथेनॉल निर्मिती करणाऱ्या घटकावरील प्रभारी अधिकारी
६. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
७. या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी
८. अभिलेख शाखा ( ५ प्रती )

MR. G. P. SABALE
Sub Inspector of State Excise
I/c of M/s. ARSS BIOFUEL PVT. LTD.
Village Wadivarhe
Tal. Igatpuri, Dist. Nashik